जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी कार्यालय सिंधुदुर्ग
(सामान्य शाखा)
ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग – 416812
दूरध्वनी क्रमांक :- 02362-228608 ई-मेल :- collroffice@gmail.com

## इतिवृत्त

विषय- मा.मुख्यमंत्री महोदय यांचे निर्देशाप्रमाणे ७ कलमी कृती कार्यक्रमांतर्गत १०० दिवसात करावयाची कार्यवाही बाबत आढावा बैठक

संदर्भ : मा.श्रीम.वल्सा नायर सिंह, अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग तथा मा. पालक सचिव, सिंधुदुर्ग जिल्हा यांच्या अध्यक्षतेखाली झालेली बैठक
दि.14/02/2025 वेळ- दुपारी १२.००

मा.श्रीम.वल्सा नायर सिंह, अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग तथा मा. पालक सचिव, सिंधुदुर्ग जिल्हा यांच्या अध्यक्षतेखाली मा.मुख्यमंत्री महोदय यांचे निर्देशाप्रमाणे ७ कलमी कृती कार्यक्रमांतर्गत १०० दिवसात करावयाची कार्यवाही बाबत आढावा बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस सोबत जोडलेप्रमाणे अधिकारी/मान्यवर उपस्थित होते. विषयांकित कामी सविस्तर चर्चा करणेत आली व खालीलप्रमाणे कार्यवाही करणेच्या सूचना देण्यात आल्या.

| अ.क्र | सात कलमी मुद्दा | आढावा बैठकीमध्ये झालेली चर्चा | अंमलबजावणी अधिकारी/कार्यालय |
|---|---|---|---|
| 1 | संकेतस्थळ | प्रत्येक विभागाने नागरिकांच्या सुलभ आणि सहज माहितीकरिता आपल्या कार्यालयाचे संकेतस्थळ सुसज्ज करणे आवश्यक आहे. सदर संकेत स्थळाचा वापर सामान्य नागरिकांच्या अडचणी सोडवण्याकरिता व्हावा याकरीता संकेत स्थळावर कार्यालयाशी संबंधित सर्व माहिती, कार्यालयाचे स्थळ, कार्यालयाच्या वेळा, कार्यालयाचे संपर्क क्रमांक, कार्यपद्धती, त्यातील अधिकारी, त्यांचे संपर्क क्रमांक, कार्यालयामार्फत महाराष्ट्र शासनातर्फे राबविल्या जाणाऱ्या योजनांचे अर्जाचे नमुने, सदर अर्ज करतांना घ्यावयाची दक्षता, आवश्यक असलेल्या पात्रता व निकष, त्याकरीता शासनास भरावे लागणारे शुल्क, योजनांच्या अंमलबजावणीसाठी शासनाने ठरवून दिलेली कालमर्यादा, योजनांच्या अंमलबजावणीमध्ये येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी या कार्यालयाच्या अंतर्गत करण्यात आलेली तक्रार निवारण यंत्रणा, तसेच कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी कार्यालयात उपस्थित असण्याच्या वेळा, भेटीच्या वेळा, तसेच कार्यालयाने आज अखेरपर्यंत चांगल्या स्वरूपामध्ये केलेल्या कामांची छायाचित्रे, नागरिकांना त्यांच्या कामाच्या अनुषंगाने मार्गदर्शक ठरणारे शासन निर्णय, आदेश, तसेच माहिती घेण्याच्या अनुषंगाने मदतपूर्ण ठरतील अशा व्हिडिओ क्लिप्स संकेतस्थळावर अपलोड/अद्यावत करणे आवश्यक आहे. ज्या कार्यालयाचे संकेतस्थळ आतापर्यंत निर्माण करण्यात आले नसेल, अशा कार्यालयांनी संबंधित विषयांशी तज्ञ व्यक्तींशी संपर्क साधून सदरचे संकेत स्थळ युद्धपातळीवरती सुरू करण्यात यावे तसेच संकेतस्थळ हे सायबर दृष्ट्या सुरक्षित असेल याबाबत गांभीर्याने दक्षता घेणे आवश्यक आहे. संकेतस्थळांवर माहिती अधिकार कायद्याखाली माहिती सार्वजनिक स्वरूपामध्ये नागरिकांना | सर्व कार्यालय, जिल्हा सिंधुदुर्ग |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सहजपणे उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे अशी सर्व माहिती सदरच्या संकेतस्थळावर अद्ययावत पद्धतीने उपलब्ध करून देण्यात यावी. सदर संकेतस्थळाचा वापर करणे सामान्य नागरिकांना सहज शक्य व्हावे याकरीता ते यूजर फ्रेंडली असावी. संकेत स्थळाचा वापर करताना कार्यालय व सामान्य नागरिक यांच्यामध्ये माहितीचे आदानप्रदान होईल अशी सहजता व सुलभता अशी असावी. | |
| 2 | सुकर जीवनमान | नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे याकरीता (ईज ऑफ लिव्हिंग) नागरिकांचे प्रश्न सोडविण्याच्या अनुषंगाने सर्व कार्यालयांनी त्यांचेशी संबंधित असलेल्या व विशिष्ट प्रयत्न करून गतीने सोडवता येतील अशा दोन गोष्टींचा समोवश या मुद्यांतर्गत करुन कार्यवाही करावी. | सर्व कार्यालय, जिल्हा सिंधुदुर्ग |
| 3 | स्वच्छता | सर्व शासकीय कार्यालयामध्ये येणारे अभ्यागत, महत्वाच्या कामांच्या पाठपुराव्यासाठी येणारे नागरिक, यांच्याकरिता तसेच कार्यालयात काम करणारे कर्मचारी आणि अधिकारी यांना प्रसन्न वाटेल असे कार्यालयाचे वातावरण ठेवावे तसेच कार्यालयात स्वच्छता ठेवण्यात यावी. कार्यालयामध्ये असलेल्या अभिलेखांचे निंदणीकरण करण्याची व जे अभिलेख कार्यालयमध्ये ठेवण्याच्या दृष्टिकोनातून आवश्यक आहेत असे अभिलेख प्रक्रियांचे अनुपालन करून अभिलेख कक्षामध्ये पाठविणे तसेच जुन्या व निरुपयोगी जडवस्तुंची विहित कार्यपध्दतीने विल्हेवाट लावावीत. | सर्व कार्यालय, जिल्हा सिंधुदुर्ग |
| 4 | जनतेच्या तक्रारींचे निवारण | नागरिकांना त्यांच्या कामाकरीता, शासकीय कार्यालयामध्ये वारंवार चकरा मारायला लागू नये याकरिता कार्यालयप्रमुख यांनी अभ्यागतांना भेटीच्या वेळा ठरवून द्याव्यात, अधिकारी अभ्यागताच्या भेटीच्या वेळी उपस्थित नसतील तर त्यांनी त्यांच्या अनुपस्थितीमध्ये सदरच्या कामाच्या अनुषंगाने वॉट्सअॅप क्रमांक सार्वजनिक करावा, जेणेकरून वॉट्सअॅपवरती प्राप्त तक्रारींचे निवारण करता येईल. अधिकाऱ्यांच्या कार्यालयातील उपस्थितीबाबत व अभ्यागतांच्या भेटीबावातचे सुस्पष्ट फलक दर्शनी भागामध्ये लावण्यात यावेत. आपले सरकार व पी.जी.पोर्टल मध्ये प्राप्त तक्रारींचे तात्काळ निवारण करण्यात यावे तसेच शासनाचे निर्देशानुसार संबंधित कार्यालयांनी त्यांचे स्तरावर त्या त्या दिवशी लोकशाही दिन राबवून लोकशाही दिनामध्ये अधिकाधिक प्रकरणांचा निपटारा करण्याची कार्यवाही करावी. | सर्व कार्यालय, जिल्हा सिंधुदुर्ग |
| 5 | कार्यालयातील सोयी-सुविधा | सर्व कार्यालयांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणेत यावी. कार्यालयीन कर्मचारी व अभ्यांगतांसाठी कार्यालयात स्वच्छता व आवश्यक दुरुस्ती करणेत यावी. अभ्यांगतांसाठी प्रतिक्षालयाची निर्मिती करणेत यावी. अभ्यांगतांसाठी मार्गदर्शक बोर्ड लावणेत यावेत तसेच कार्यालयांचे सुशोभीकरण करणेत यावे. | सर्व कार्यालय, जिल्हा सिंधुदुर्ग |
| 6 | गुंतवणुकीस प्रोत्साहन | जिल्यातील गुंतवणुक वाढीसाठी व प्रसारासाठी सामुहिक प्रयत्नांची गरज असल्याने सर्व कार्यालयांनी सामुहिकपणे प्रयत्न करावेत तसेच गुंतवणुकदारांच्या तक्रारींचे निवारण त्या-त्या वेळी करण्यात यावे. | सर्व कार्यालय, जिल्हा सिंधुदुर्ग |
| 7 | क्षेत्रभेटी | जिल्हयातील विविध महत्त्वाच्या कार्यक्रम आणि योजनांच्या अंमलबजावणीसाठी क्षेत्रभेटी अधिक संख्येने करावीत. शासनस्तरावरून ठरविण्यात आलेले लक्ष्य योग्य प्रकारे नियोजन करून पूर्ण करण्याकरीता प्रयत्न करावेत. काही ठिकाणी अचानक क्षेत्र भेटी देऊन सूचनांची अंमलबजावणी होत आहे यावर लक्ष ठेवणे गरजेचे आहे. त्याचबरोबर होणारी कामे ही | सर्व कार्यालय, जिल्हा सिंधुदुर्ग |

| | | | |
|---|---|---|---|
| | | गुणवत्तापुर्ण आहेत काय व कालमर्यादेमध्ये होत आहेत का? याबाबत कार्यवाही करावी. | |
| ४ | सात कलमी कार्यक्रमांतर्गत इतर मुद्द्यांवर झालेली चर्चा | जिल्हयातील धरणांची सुरु असलेली सर्व कामे प्रगती पथावर व मिशन मोडवर पुर्ण करावीत. तसेच जिल्हयातील धरणांशी संबंधित भूसंपादनांची कामे तातडीने पुर्ण करावीत. | सर्व पाटबंधारे विभाग/जलसंपदा विभाग, सिंधुदुर्ग जिल्हा तसेच उपजिल्हाधिकारी भूसंपादन (जिल्हा मुख्यालय / लघुपाटबंधारे विभाग), जिल्हाधिकारी कार्यालय सिंधुदुर्ग |
| | | जिल्हयामध्ये वन्य प्राण्यांपासून होणारा त्रास दुर करणेची कार्यवाही करावी. | मुख्य वनसंरक्षक सावंतवाडी, वनविभाग सिंधुदुर्ग जिल्हा |
| | | जिल्हयातील लाईव्हस्टॉक वृध्दीबाबत तसेच त्यांची प्रजननक्षमता वाढीसाठी सर्वोतोपरी प्रयत्न करुन कार्यवाही करावी. | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, राज्यस्तर, सिंधुदुर्ग जिल्हा तसेच जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग |
| | | सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा असून या जिल्हयामध्ये पर्यटनाच्या सर्व सोयीसुविधा निर्माण कराव्यात. पर्यटन विभागामार्फत सुरु असलेले सर्व प्रकल्प जलदगतीने पुर्ण करावेत. हॉटेल ताज बाबत भूसंपादनाची कार्यवाही गतीने करावी. सिंधुरत्न व चांदा ते बांदा योजनंतर्गत जिल्हयामध्ये गुंतवणुक वाढीसाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही करावी. पर्यटनाच्या तक्रारींचे निवारण त्या-त्या वेळी करण्यात यावे. पर्यटन क्षेत्रामध्ये गुंतवणुक वाढ कशी होईल याचे नियोजन करुन सत्वर कार्यवाही करावी. | एम.टी.डी.सी.विभाग, (पर्यटन) सिंधुदुर्ग जिल्हा |
| | | जिल्हा परिषद सिंधुदुर्ग योजनेंतर्गत सुरु असलेल्या सिंधु समृध्दी योजनेचे काम गतिमान करुन लाभार्थ्यांना लाभ देण्याची कार्यवाही करावी | मुख्य कार्यकारी अधिकारी, सिंधुदुर्ग |
| | | छत्रपती शिवाजी महाराज यांचे शिवस्मारक बसवण्याचे काम गुणवत्तापुर्ण व विहित कालबध्द कार्यक्रमामध्ये पुर्ण करावे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे शिवस्मारक सुरक्षेच्या दृष्टीने व चिरंतनकाल टिकेल याची विविध निकषाच्या आधारे गुणवत्तापुर्ण तपासणी करुन कार्यवाही करावी. | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सिंधुदुर्ग जिल्हा |

बैठकीच्या अखेरीस आवश्यक त्या सूचना संबंधित कार्यालय/विभागांना देऊन बैठक समाप्त करण्यात आली.

(अनिल पाटील)
जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग

क्र.साशा/डेस्क-५/सात कलमी/१०० दिवस/बैठक/०२/२०२५
दिनांक १४/०२/२०२५

प्रत- सर्व संबंधितांस